पशुसंगोपन

# जनावरे खरेदी करताना वयनिश्चिती करण्याची रीत



**प्रा.डॉ. व्ही.जी. अतकरे**
(मो.नं. ८२७५२८८३०१)
पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,
कृषी महाविद्यालय, नागपूर
**डॉ. श्रीकांत खुपसे**
सहायक प्राध्यापक, वसंतराव नाईक
ग्रामीण कृषी महाविद्यालय, नेहरूनगर,
ता. कंधार, जि. नांदेड



जनावरांची खरेदी करताना त्यांच्या वयाचा अंदाज घेणे आवश्यक आहे. नेहमी कमी वयाच्या गाई व बैलांची निवड करावी. शक्यतो पहिले वेत पूर्ण केलेली व दुसरे वेत असलेली गाय खरेदी करावी. गुराचे वय त्याच्या दातांवरून ठरवावे. विक्रीसाठी आलेल्या जनावरांची शिंगे तासून, रंग देऊन गुरांचे वय लपविण्याचा प्रयत्न काही ठिकाणी दलालांनी केल्याचे आढळून येते. यासाठी लेखात दिलेली माहिती उपयुक्त ठरेल.

**प**शुपालन यशस्वी व फायदेशीर व्हावे या दृष्टीने दुभत्या जनावरांची खरेदी योग्य पद्धतीने झाली पाहिजे. त्यासाठी त्यांचे वय हा महत्त्वाचा मुद्दा आहे. याकरिता ढोबळमानाने वय ठरविण्याच्या किंवा ओळखण्याच्या तीन पध्दती प्रचलित आहेत.

१) **शरीरावरून** : या पध्दतीमध्ये जनावरांच्या शरीरावरून त्यांचे वय ठरवितात. तरुण जनावरांची कातडी मुलायम, घट्ट व केस चमकदार असतात. शिंगे छोटी असतात तर वयस्कर जनावरांचे केस जाडे-भरडे, सैल कातडी आणि लांब वाढलेली शिंगे आढळतात. या पध्दतीने ढोबळमानाने जनावराचे वय अनुभवी माणसालाच समजू शकते. जनावराच्या वाढत्या वयाने शारीरिक वाढीनुसार त्याच्या शिंगांमध्ये देखील वाढ होत असते. वय ठरविण्याकरिता प्रामुख्याने खालील गोष्टींवरून परीक्षण केले जाते.

२) **शिंगांवरून** : जनावरांच्या वयाच्या तीन वर्षांपर्यंत शिंगांची सरळ वाढ होते. पण त्यानंतर सुरूवातीला वाढलेल्या शिंगापेक्षा मोठे शिंग वाढते, त्यामुळे पहिल्या शिंगावर दुसऱ्या वाढीचा थर आल्यासारखा दिसतो, त्याला शिंगवर्तुळ असे म्हणतात. यावरून दुसऱ्या पध्दतीचा उगम झाला. त्यानंतर प्रत्येक वर्षाला एक याप्रमाणे वर्तुळे वाढत जातात. या शिंगवर्तुळांच्या संख्येवरून जनावराचे अंदाजे वय काढण्याचे असे समीकरण तयार करण्यात आले.

**जनावराचे वय (वर्षे) = शिंगावरील वर्तुळे + २**

जनावरांच्या खाद्यानुसार त्यांच्या हाडांची वाढ होत असते. त्याचप्रमाणे जनावरे विकणारे चतुर दलाल





जनावरांची शिंगे तासून गुळगुळीत करतात. त्यामुळे त्या पध्दतीने फार क्वचित वय मोजता येते.

३) **दातांवरून परीक्षण** : सर्वात विश्वसनीय धरली जाईल अशी पध्दती म्हणजे जनावरांच्या दातांवरून त्यांचे वय ओळखणे. दातांचे तीन भाग आहेत. वरील भागास दातांचा मुकूट, मधल्या भागास दाताची मान व उरलेल्या भागास दाताचे मूळ असे म्हणतात. खाद्यपदार्थास कापल्याने व भरडल्याने होणाऱ्या घर्षणाचा दातावर परिणाम होऊन ते झिजतात. ठरावीक झिजेवरून त्यांचे वय ठरविण्यात येते.

जनावरांचे दात दोन प्रकारचे असतात. जन्मत:च किंवा प्रथमत: येणाऱ्या दातांना दुधाचे दात असे म्हणतात. जनावरांच्या दातांचे विभाजन त्यांच्या अन्न तोडण्याच्या प्रकारानुसार करण्यात येते. खालच्या जबड्यात असणाऱ्या समोरील आठ दातांना कापणारे दात म्हणतात, त्याचे मुख्य काम म्हणजे अन्नाचे तुकडे करणे, केलेल्या तुकड्यांना अजून बारीक करण्यासाठी दाढांचा उपयोग करतात.

दोन्ही जबड्यांना प्रत्येक भागाच्या प्रथम तीन दाढांना पूर्वदाढा म्हणतात आणि उरलेल्या मागील बाजूच्या तीन दाढांना मुख्य दाढ संबोधतात. कापणारे दात फक्त खालच्या जबड्यात असतात. वरील जबड्यातील, हिरड्यांचे रूपांतर कडक हिरड्यांमध्ये झालेले असते.

जनावरामध्ये कायमचे दात खालील दिलेल्या तक्त्यानुसार निघतात. वय ओळखण्याकरिता खालच्या जबड्यातील कायमच्या दातांचे निरीक्षण करावे.

| कायम दातांच्या जोड्या | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | दात जोडी | जनावराचे वय | दातांची संख्या |
| १ | पहिली जोडी | दोन ते अडीच वर्षांनंतर | दोन दात |
| २ | दुसरी जोडी | तीन ते साडेतीन वर्षांनंतर | चार दात |
| ३ | तिसरी जोडी | साडेतीन ते चार वर्षांनंतर | सहा दात |
| ४ | चौथी जोडी | चार ते साडेचार वर्षांनंतर | आठ दात |

आपल्याला शेळ्या व मेंढ्यांची खरेदी करताना दातांच्या निरीक्षणावरून वयनिश्चिती करता येईल. शेळ्यांची वयनिश्चिती ही सुरूवातीच्या काही वर्षांपर्यंत करणे अगदी सोपे जाते. या पध्दतीला शेळ्यांचे वय निश्चितीकरिता दातांवरून परीक्षण करणे असे म्हणतात. शेळीच्या करडांच्या खालच्या जबड्यामध्ये आठ दुधाळ दात असतात. सर्व आठ दात लहान आकाराचे व एकसारखे असतात. ज्यावेळेला शेळीचे वय एक वर्षाचे होते त्यावेळेला मधील दोन दुधाळ दातांच्या जागी दोन कायमस्वरूपी दात येतात. त्यामुळे जर शेळीच्या खालच्या जबड्यामध्ये फक्त दोन कायमस्वरूपी दात असतील तर त्या शेळीला दोन दाती शेळी असे म्हणतात आणि या वेळेला शेळीचे एक वर्ष एवढे वय गृहीत धरण्यात येते. तसेच याच पध्दतीनुसार दोन कायमस्वरूपी दातांच्या लगतच्या दुधाळ दातांच्या जागी दोन कायमस्वरुपी दात येतात. त्यावेळेला शेळीला चार दाती शेळी म्हणतात. या वेळेला शेळीचे अंदाजे दोन वर्ष वय असते. वयाच्या तिसऱ्या वर्षी कायमस्वरूपी दातांची तिसरी जोडी दुसऱ्या





कायमस्वरूपी जोडीच्या बाजूने खालच्या जबड्यामध्ये येते. या वेळेला त्या शेळीला सहा दाती शेळी म्हणतात.

शेवटी शेवटच्या दुधाळ दातांच्या ठिकाणी कायमस्वरूपी दाताची जोडी येते. यावेळी शेळीचे वय चार वर्ष एवढे गृहीत धरण्यात येते. खालच्या जबड्यातील या सर्व कायमस्वरूपी दातांना कापणीचे अथवा कातरणारे दात असे म्हणतात.

त्याचप्रमाणे मेंढ्यांचे वय निश्चितीकरण सुध्दा आपल्याला दाताचे परीक्षण करून करता येते. कोकराला जन्मत:च आठ दात असतात या दाताला शेळ्यांच्या दाताप्रमाणे दुधाळ दात असे म्हणतात. ज्या वेळेला मेंढ्याचे वय एक वर्षापर्यंत होते त्यावेळेला मधल्या दुधाच्या दाताच्या जोडीच्या जागी दोन कायमस्वरूपी दाताची जोडी येते. तसेच ज्या वेळेला मेंढ्याचे वय दोन वर्षाचे असते त्यावेळी पुन्हा खालच्या जबड्यामध्ये दोन दुधाळ दाताच्या जागी दोन कायमस्वरूपी दाताची जोडी येते.

अशाप्रकारे तिसऱ्या व चौथ्या वर्षी दोन दुधाळ दातांच्या जागी अनुक्रमे तिसरी व चौथी कायमस्वरूपी दाताची जोडी मेंढ्यांच्या खालच्या जबड्यात येते.

वयाच्या पाचव्या वर्षानंतर दोन दातांमधील अंतरात वाढ होऊन दात झिजण्याची प्रक्रिया सुरू होते व कालांतराने दात पडतात. अंदाजे वयाच्या दहाव्या वर्षी मेंढ्याच्या जबड्यामधील दात नसतात. अशा काही पद्धती वापरून पाळीव जनावरांची वयनिश्चिती करता येते. ■